प्रेस नोट,

दिनांक :- ०६/११/२०१७

**सहकारनगर पो.स्टे. परिसरात दहशत पसरविणा-या अट्टल गुन्हेगारावर एम.पी.डी.ए. कायदयान्वये स्थानबध्दतेची कारवाई**

सहकारनगर पो. स्टे. हद्दीत राहणारा गुन्हेगार इसम नामे गणेश सुभाष मसुरकर, वय २५ वर्षे, रा. कोलवडी, पोष्ट जावळी, तालुका भोर, जि.पुणे हा अभिलेखावरील सराईत गुन्हे करणारा गुन्हेगार आहे. त्याने त्याचे साथीदारांसह सहकारनगर, भारती विद्यापीठ, वाकड पोलीस ठाणे परिसरात कोयता, तलवार यासारखी जीवघेणी हत्यारे बाळगुन खुन, खुनाचा प्रयत्न, दुखापत, पळवून नेणे यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत. त्याची गुन्हेगारी कृत्ये सन २०१० पासून चालू आहेत. वेगवेगळया पोलीस स्टेशनला त्याचेविरूध्द ५ गुन्हे दाखल आहेत. त्याचेविरूध्द प्रतिबंधक कारवाई करण्यात येवून सुध्दा त्याचे गुन्हेगारी कृत्यांवर काहीएक परिणाम होत नसलेचे दिसून आले होते. त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सदर परीसरातील सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झालेली होती. तसेच त्याच्यापासून जिवीताचे व मालमत्तेचे नुकसान होईल या भितीमुळे नागरिक उघडपणे तक्रार करणेस धजावत नव्हते.

श्री. रविंद्र कदम, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, गुन्हे श्री. अप्पासाहेब वाघमळे सहकारनगर पो.स्टे. यांनी एमपीडीए कायदयान्वये नमुद इसमास स्थानबध्द करण्याकामी प्रस्ताव तयार करुन मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचेकडे सादर केला होता. श्रीमती रश्मि शुक्ला, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी प्रस्तावाची पडताळणी करुन नमुद इसमाचेविरुध्द दिनांक ०६/११/२०१७ रोजी एमपीडीए कायदयान्वये एक वर्षाकरीता स्थानबध्दचे आदेश पारीत केले आहेत. त्यानुसार त्यास कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह, कळंबा, कोल्हापूर येथे स्थानबध्द करुन ठेवण्यात आले आहे.

रश्मि शुक्ला, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी जे गुन्हेगार सर्वसामान्य कायदयातुन पळवाटा काढून गुन्हेगारी कृत्ये चालू ठेवतात अशा गुन्हेगारांवर एम.पी.डी.ए व मोका अशा कडक तरतुदी असणा-या विशेष कायदयान्वये कारवाई करण्याचे धोरण अवलंबिलेले आहे.

त्यामुळे गेले दहा महिन्यात अशा गुन्हेगारी वृत्तीच्या १९ इसमांना एमपीडीए कायदयान्वये स्थानबध्द केले आहे.तसेच १३ वेगवेगळया संघटित टोळयांचे विरूध्द मोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

---oo----